

# बायबल अध्ययन साहित्य

“चला, आपण परमेश्वरास ओळखू; अरुणोदयाप्रमाणे .......... भूमि शिंपणाऱ्या वळवाच्या पर्जन्याप्रमाणे आम्हाकडे येईल.” होशेय ६:३

# बायबल शिक्षणाचे तत्व

## उद्देश

दर आठवडयाला प्रत्येक भागीदाराने देवाच्या वचनासोबत सातत्याने वेळ घालवावा ही आमची प्रार्थनापूर्वक इच्छा आहे. हयासाठी की, त्यांनी परमेश्वर जो ज्यांना उत्पन्नकर्ता आहे हयांस ओळखने शिकुन त्यासोबत चालावे.

## मुल्य

- देवाचं वचन आपल्या जीवनातील प्रश्नांना पाया म्हणुन स्थापित करणे.
- स्त्री आणि पुरुषांना देवाच्या प्रेमाची समज राखण्या करीता उत्तेजन देणे आणि दर आठवडयांत आपल्या मनांत ख्रिस्ताचे प्रतिबिंब पाडणे.
- जसे पिता आम्हाला स्वतःकडे ओढतो तसे देवाच्या वचनांस शिकण्या करीता इच्छा चेतावणे.
- दर आठवडयातील वर्गामधिल सेवेकरीता देवावर अवलंबून राहण्याकरिता प्रार्थनेचा सराव करणे.
- इतर विश्वास बाळगणाऱ्या प्रत्येकाला सत्य शोधण्यास देवाच्या वचनाचा अभ्यास करण्याकरीता आमंत्रीत करणे.
- इतर विश्वास बाळगणाऱ्या प्रत्येकाला सत्य शोधण्यास देवाच्या वचनाचा अभ्यास करण्या करीता आमंत्रित करणे.
- प्रिती आणि दास स्वरुप मधिल उद्देशांची एकता प्रतिबिंबित करणे.
- नेमलेल्या कार्याकरीता देवाच्या पाचारणास तैयार करण्याकरीता प्रत्येक पुढाऱ्यांस प्रशिक्षण देणे.

## ध्येय

- प्रत्येक सदस्य देवासोबत नियमित वेळ घालवित आहे. (प्रश्नांची उत्तर देण्यात) हे बघणे.
- दैनंदिन जीवनात बायबलचा संबंध जोडण्याची योग्यता वाढविणे.
- नियमीत इतरांसाठी प्रार्थना करणे.
- उत्तरांसाठी देवाच्या वचनाकडे अधिकाधिक वळणे.

- चर्चेमध्ये प्रत्येक सदस्याला सहभाग घेण्यास उत्तेजित करणे.
- देवाने काम केले आणि काय करीत आहे हे मोकळया मनाने सांगणे.
- देवाची प्रिती पसरविण्यासाठी संधीच्या शोधांत असणे.

# इफिसकर : ख्रिस्ताचे शरीर

## लेखक

अंतर्गत व बाहेरील पुरावे पौल हाच इफिसकरांस पत्राचा लेखक असल्याचे सांगतात. एक यहुदी, परुशी आणि मंडळीचा छळ करणारा "शौल" प्रारंभीक मंडळीतील विश्वासणाऱ्यांना नाश करण्याच्या वाटेवरअसतांना पुनरुत्थित ख्रिस्ताव्दारे सामना करण्यात आला. तो विश्वासात आला आणि पुर्णपणे आतुन व बाहेरुन परिवर्तीत झाला. त्याला नवे नाव नवे पाचारण देण्यात आले. बऱ्याच काळापासुन दडलेले रहस्य की, तारणाची कृपा हेल्लेण्यांकरीता उपलब्धआहे, हे पौलास प्रकट करण्यात आले. ही सुवार्ता पसरविण्याकरीता त्याने तीन मिशनरी प्रवास केले, सर्व समयांतील तो एक महान सुवार्तीक आणि नव्या करारातील नियतकालिकात लेख लिहीणारा ठरला. (प्रेषितांची कृत्ये हे पुस्तक त्याच्या परीवर्तनाविषयी, त्याचे प्रेषीतीय पाचारण आणि त्याच्या हेल्लेण्यांकरीता तीन मिशनरी यात्रा हयांचे वर्णन करते.) पौलाची साक्ष हयाचा पुरावा आहे की, देव कोणाचेही अंतःकरण आणि जीवन बदलु शकतो.

## वेळ

अधिकतर लोक हा विश्वास बाळगतात की, इफिसकरांस पत्र ख्रिस्त पश्चात ६०-६२ दरम्यान लिहिले गेले. हया तारखा पौलाचे रोम मधील दोन वर्षांचे गृहकैदेविषयी सांगतात जे प्रे. कृत्ये २८ मध्ये नमुद आहे. देवाने हया स्थिरतेच्या वेळेला आणि पौलाच्या जीवनातील त्रासाला इतरांच्या भल्यासाठी उपयोगी आणले. जेव्हा त्याची सेवा मर्यादित झाली होती, तेव्हा रोमी सैनिकांना, यहुदी सभेच्या पुढाऱ्यांना तसेच जे त्याला भेटावयास आले त्यांना तो सुवार्ता सांगू शकत होता. त्याने बंदिवासातुन चार पत्रे लिहिली : इफिसकरांस, फिलिप्पैकरांस, कलस्सैकरांस आणि फिलेमोन. हयांपैकी इफिसकरांस समवेत तीन पत्रे पौलाने आपल्या दुसऱ्या मिशनरी प्रवासातील मंडळयांना लिहीली. (प्रेषित २० : १-३)

## प्रेक्षक

आज जे तुर्कीचा भाग म्हणुन ओळखले जाते, प्राचीन इफिस आशिया मायनर मधील रोमी साम्राज्यात वसलेले महत्वाचे शहर होते. एक व्यस्त बंदर, जे वेगवेगळया राष्ट्रांतुन आलेल्या लोकांव्दारे गजबजलेले होते. पौलाच्या दुसऱ्या प्रवासाच्या शेवटी त्याने एक तत्काल भेट इफिस येथे दिली आणि परतीच्या प्रतिज्ञेने त्यांना सोडुन गेला. (प्रेषित १८ : १९-२०) आणि तो परत देखील आला. त्याच्या तिसऱ्या मिशनरी प्रवासात देवाने पौलास इफिस येथे ३ वर्षे राहण्यास मदत केली (प्रेषित २० : ३१) अशा समयी, काही विश्वासयोग्य मनुष्यांनी येशु विषयी सुवार्तेला प्रतिसाद दिला आणि मंडळी वाढली. आता इफिस येथील लोक मुर्तीपुजक, अंधविश्वास बाळगणारे आणि रोमन देव डायनाचे उपासक होते. परंतु जेव्हा त्यांचा सामना सुवार्तेशी झाला, अनेकांनी आपल्या मार्गातुन परावृत्त होऊन खऱ्या देवाकडे वळले. त्यांनी आपले जादु विद्येची पुस्तके जाळली आणि ख्रिस्तामध्ये नव्या जीवनासाठी जुने जीवन मागे सोडले. देवाने तुम्हाला संपुर्ण स्वातंत्र देऊन तुम्हाला नव्या दिशेने घेऊन जाण्याकरीता काय तुमच्या जीवनात अजुनही असे काही आहे जे तुम्हाला सोडणे गरजेचे आहे ? चला देवाला मदत मागुया की, त्याने आमचे दडलेल्या पापां विषयी डोळे उघडून ते प्रकट करावे ?

## घोषवाक्य

हे सुचनात्मक पत्र प्रायोगिक सल्ल्यांनी आणि प्रोत्साहनाने भरलेले आहे, आम्हांस ख्रिस्त येशु मधील आशिर्वादांची आठवण करुन देते आणि त्या सर्वांसाठी जे आमच्यासाठी देण्यात आले आहेत करीता जीवन जगण्यास उत्साहीत करते. ते दोन घोषवाक्यांमध्येही विभागले आहे : स्थानाचे सत्य आणि प्रायोगिक सत्य. पहिल्या तीन अध्यायांत पौल देवाच्या सुटकेच्या योजनेबद्दल आणि ख्रिस्ताचे विश्वासी म्हणुन आपले स्थान बाबत सांगतो. ख्रिस्ताने पुर्वापार पाडलेले कार्य आपले श्रीमंत आशीर्वाद आणि ख्रिस्ताव्दारे देवासह आपले संबंध हया विषयी शिकतो. पौल आपल्या जीवनातील प्रकट गोष्टींना सांगतो कारण आपण ख्रिस्ताच्या जवळ करण्यात आलेले आहोत. तो कधीही प्रकट न करण्यात आलेले सत्य प्रकट करतो - ते हे की, यहुदी आणि हेल्लेणी तारणाचे वरदान मिळण्याकरीता बोलाविण्यात आलेले आहेत. ते एका उद्देशाने ख्रिस्ताच्या देहात एक करण्यात आलेले आहेत आणि त्यांच्या जुळवणुकीमुळे स्वर्गीय राज्यात देवाची प्रिती आणि कृपा प्रकट होते. पौल हया घोषवाक्याची समाप्ती शास्त्रात प्राप्त

एका सुंदर प्रार्थनेने करतो. (अध्याय २ : १४-१९) तो पित्याला आत्म्याने त्यांना सामर्थ्यवान बनविण्याकरीता विनंती करतो. जेणे करुन त्याच्या अंतःकरणात ख्रिस्त विश्वासाने राहावा, जेणे करुन ख्रिस्ताची प्रिती त्यांस समजावी आणि शेवटी त्यांनी देवाच्या परीपुर्णतेस प्राप्त करावे. अध्याय ४ ते ६ देवाच्या सुटके विषयी आपली भुमिका दर्शवितात आणि त्यामधील उपयोगात आणणाऱ्या गोष्टी प्रकट करतात. तो मंडळीच्या एकतेसह सुरुवात करतो. नंतर तो विश्वासी म्हणुन आम्हाला हेतु पुरस्सर जीवन जगण्यास आणि स्वसमाधानी आणि असुरळीतपणा विषयी सांगतो. हया कारणास्तव, पौल शेवटच्या अध्यायात आम्हास आठवण करुन देतो की, आम्ही पुर्णपणे सावध असावे आणि शस्त्र धारण करावे. कारण आपले युध्द देह, सैतान आणि संसारा विरोधात आहे. शेवटी आपले लक्ष देवाचे वचन, त्याचा आत्मा (६ : १०-१७) आणि निरंतरची प्रार्थना (६:१८) प्राप्त करण्याकडे असावे.

हे दोन्ही घोषवाक्य जुळलेल्या सिंध्दांताला आधारभूत ठरतात की, आपण ख्रिस्ता मध्ये नवी सृष्टी आहोत. पौल ख्रिस्तामध्ये हा शब्द हया पत्रात अनेकदा वापरतो. विश्वासणाऱ्यांसाठी हे पारदर्शी सत्य होय आणि हयाच कारणास्तव पौल पहिल्या व तिसऱ्या अध्यायात प्रार्थना करतो की, आपण ते समजावे व उपयोगात आणावे. कारण आपण नवी सृष्टी आहोत, जे ख्रिस्तासोबत मारले गेलो आणि त्याच्या सोबत पुन्हा उठलो, त्या आम्हावर त्याची छाप आणि त्याचा हेतु आहे. हे सत्य पौलाच्या पत्राचा पाया आहे.

# इफिसकर : ख्रिस्ताचे शरीर

## प्रकरण १ : अध्याय १

**विषय वाक्य : देवाने आम्हाला सार्वकालिकते करीता पूर्वीपासून निवडले आहे.**

### दिवस १

**वाचा प्रेषित १८ : २४- २८ आणि १९: १-७**

१. इफिसमध्ये कोणी आणि काय शिकविले ?

२. इफिसमध्ये कोणती अतिरिक्त माहिती पौलाने आणली जी त्यांच्यासाठी नवी होती ?

३. इफिसकरांनी येशुवरील आपला प्रभू आणि तारणारा असा विश्वास प्रकट करण्याकरीता कोणता पुरावा दिला ?

४. पेंटेकॉस्टच्या समयी  जशी देवाने खात्री पटविली तशी तेथील विश्वासणाऱ्यांच्या निर्णयाची खात्री देवाने कशी पटविली ?

### दिवस २

**वाचा प्रेषित १९ :८-२३**

१. ज्यांनी संदेश ऐकला त्यांच्या बद्दल पौलाची क्रिया आणि प्रतिक्रिया कोणते शब्द प्रकट करतात?

२. येशु नावाच्या अधिकाराशिवाय दुष्ट आत्म्याशी सामना विषयी आपण काय शिकतो ?

३. अनुवाद १८ : ९-१४ मधील जादुचे प्रकार सांगा .

४. हया पैकी कोणता प्रकार तुम्ही आपल्या समाजात बघता ?

५. प्रार्थनेविषयी हयांतुन तुम्हास काही मदत पोहचते काय ?

### दिवस ३

**वाचा प्रेषित १९**

१. आपल्या गुप्त सवयींपासुन इफिसकरांनी स्वतःला कसे धुतले आणि शुध्द केले ?

२. असियामध्ये पौलाने उपदेश करण्यात व शिकविण्यात किती वेळ घालविला ?

३. जेव्हा येशु जो एकमात्र आणि सत्य देव आहे हयाचा संदेश कोणी स्विकार करत नाही तेव्हा आपण कसे प्रत्युत्तर द्यावे ?

## दिवस ४

**वाचा इफिस १ : १ - १४**

१. पौल कोणास लिहित आहे ?

२. ज्या पध्दतीने (शब्दांनी) देवाने विश्वासणाऱ्यांना आशिर्वाद दिला ते लिहा ?

अ) पूर्वीचे आशिर्वाद (वचन ४ - ६)

ब) वर्तमानाचे आशिर्वाद (वचन ७ - १४)

क) भविष्याचे आशिर्वाद (वचन १३ - १४)

३. देवाला ख्रिस्त येशू मध्ये जे तुम्ही आहा त्याकरीता धन्यवाद द्या!

## दिवस ५

**वाचा इफिस १ : १५-२३**

१. कोणत्या दोन गुणवैशिष्टयांकरीता पौल देवाला धन्यवाद देतो ?

२. तुम्ही कोणत्या गोष्टीच्या पक्षासाठी उभे राहावे हे लोकांनी जाणावे अशी तुमची इच्छा आहे ?

३. वचन १७-१८ मध्ये पौल देवाला इफिसकरांना कोणत्या गोष्टींना देण्यास विनवितो त्याची यादी बनवा.

४. वचन १८-१९ मध्ये इफिसकरांविषयी पौलाची जी इच्छा आहे त्याची यादी बनवा.

५. काय कोणातरी विषयी तुम्ही प्रार्थना करु शकता ज्यांना तुम्ही आता ओळखता ?

६. जे विश्वास ठेवतात त्यांच्या बद्दल देव आपले सामर्थ्य कसे व्यक्त करतो ? (वचन २०-२२)

७. मंडळीचे मस्तक कोण आहे ?

**दिवस ६**

**प्रकरण १ : "विश्वासणाऱ्यांकरीता आशिर्वाद"**

**पाठ** : अध्याय १

**मुख्यवचन:** इफिस १ : ३, ‘‘आपल्या प्रभु येशु ख्रिस्ताचा देव व पिता धन्यवादीत असो. त्याने स्वर्गातील सर्व आध्यात्मिक आशिर्वाद देऊन आपल्याला ख्रिस्तामध्ये आशिर्वादित केले आहे. ’’

**विषय वाक्य :** देवाने आम्हास सार्वकालिक हेतु करीता पूर्वीपासुन निवडून ठेवले आहे.

**जिवन तत्व:** आपले जीवन मौल्यवान आहे. कारण देवाने आम्हाला सार्वकालिक हेतु देऊ केलेला आहे.

**सारांश :** मुळ भाषेत, पौल हया पत्राची सुरुवात स्तुतीच्या गिताने करीत आहे. (वचन ३ - १४) आणि तो ते एक वाक्यस्वरुपात लिहितो. तो देवाच्या लेकरांची म्हणुन जे आध्यात्मिक आशिर्वाद आमचे आहेत त्याला नमुद करतो. निर्माणकर्त्या देवाव्दारे आपल्या जीवनातील मुल्य आम्हांमध्ये रोवलेले आहे. आम्ही एका उद्देशाकरीता निवडलेले होतो. त्याने सृष्टिच्या पुर्वीपासुन आम्हाला नेमुन ठेवले आहे. त्याच्या, आमच्याबद्दल महान कृपेकरीता आम्हाला सुटका आणि क्षमा मिळाली आहे. त्याने आपल्या इच्छेतील रहस्य आपल्या कृपायुक्त हेतुने जे सर्व काही ख्रिस्तामध्ये सामावून घेणारे आहे त्याव्दारे आमच्याकरीता प्रकट केले आहे. आम्हाला देवाच्या कुंटुंबात वारसा प्राप्त आहे. आणि आम्ही पवित्र आत्म्याच्या प्रतिज्ञेने देवाची त्याच्या गौरवाकरीता असलेली संपत्ती असे शिक्कामोर्तब आहोत. हे किती सामर्थी ज्ञान आहे आणि आमच्या अंतःकरणासाठी उत्साह ! देवाच्या कार्याबद्दल इतके आभारी स्तुतीचे गीत प्रस्तुत केल्यानंतर, पौल प्रार्थना करतो की, आम्ही खरोखर सुवार्ता समजुन घ्यावी ! तो देवज्ञानाच्या प्राप्तीसाठी प्रार्थना करतो आणि देवाला समजण्याकरीता प्रकाशन मागतो. तो प्रार्थना करतो की, देवाचे सत्य आपल्या वैयक्तिक अनुभवांमध्ये परावर्तीत व्हावे तेव्हा आपल्या अस्तित्वात तीन गोष्टी उघडीस येतील :

१. देव आम्हाला त्याच्या स्वतःबद्दलचे ज्ञान व बुध्दी देईल.

२. देव आम्हाला समजण्यास मदत करेल की संतां समवेत (अब्राहामापासून आजपर्यंत) वारसा मिळविण्यास जी आमची खात्रीपूर्वक आशा आहे, आणि

३. आम्ही त्याचे अतुलनीय सामर्थ्यांतील मोठेपण - आज उपलब्ध पुनरुत्थानाचे सामर्थ !

इब्रिलोकांस व कलसैकरांस पत्राच्या सुरुवातीसमानच, पौल इफिसकरांना ख्रिस्ताच्या श्रेष्ठत्वाव्दारे पत्र सादर करतो. देवाने ख्रिस्ताच्या देहावर सर्वाधिकार देऊ केला आहे. मंडळी त्याचे शरीर आहे आणि तो मंडळीचा मस्तक. आपण त्याची इच्छा प्रकट करण्यास व पूर्ण करण्यास रचले गेलो आहोत. देहाचा उद्देश हा, "जो सर्वांनी सर्वकाही भरतो" (इफिस १ : २३ ब), आहे. काय तुम्ही स्वतःचा हया पध्दतीने विचार करता ? तुम्ही स्वतःचा देव जसा तुमच्या विषयी विचार करतो (एक शरीर जे संपूर्णता देवाने भरलेले, भरुन वाहणारे) तसा विचार करण्याचा धाडस करता काय ?

हे सर्व स्वतःच्या शब्दामध्ये लिहुन काढण्यासाठी थोडा वेळ काढा आणि इतरांसाठी देखील प्रार्थना करा.

**आपले जिवन मौल्यवान आहे कारण देवाने सार्वकालिकतेचा हेतु आम्हास देऊ केलेला आहे.**

# इफिसकर : ख्रिस्ताचे शरीर

## प्रकरण १ : अध्याय २

**विषय वाक्य :** पुर्वी आम्ही परराष्ट्रीय देवापासुन दुर होतो, परंतु विश्वासणारे म्हणुन आम्ही देवाचे निवासस्थान ठरतो.

### दिवस १

**वाचा इफिस २ : १-३**

१. मनुष्य जेव्हा आपल्या पापांत असतो तेव्हा अवस्थेची आणि क्रियांची यादी बनवा.

२. ख्रिस्ताशिवाय आम्हास काय पाहिजे

### दिवस २

**वाचा इफिस २ : ४ -१०**

१. देवाने आमच्यासाठी जे केले (किंवा करणार) त्यांची नावे लिहा

२. वचन ८-९ नुसार आमचे तारण कसे झाले.

३. एखादी व्यक्ती विश्वास कशी प्राप्त करते ? (रोम १० : १७ देखील बघा)

४. आम्ही काय करण्या करीता रचिले गेले आहो. ?

५. तुमच्या हया जीवनात कोणते चांगले काम करण्याकरीता देवाने तुम्हाला तैयार केले आहे, असे तुम्हांस वाटते ?

### दिवस ३

**वाचा इफिस २ : ११ - २२**

१. ख्रिस्तापूर्वी हेल्लेण्यांची (आमची ) स्थिती कशी होती तिचे वर्णन करा ?

२. ख्रिस्तानंतर हेल्लेण्यांची (आमची) स्थितीचे वर्णन करा ?

३. कोणती स्थिती तुमच्या जीवनाचे वर्णन करते ?

## दिवस ४

**वाचा इफिस २ : १३ - १८**

१. वचन १३ नुसार कोणती गोष्ट आम्हाला देवाजवळ घेऊन येते ?

२. वचन १४ मध्ये ख्रिस्ताचे वर्णन कसे केले आहे ? (बघा वचन १५ आणि १७)

३. आपल्या देवबापाकडे जाण्याचा आम्हास मार्ग कोणता ? (१७-१८)

४. तुमच्या जीवनात हयाचा अनुभव घेता काय ?

## दिवस ५

**वाचा इफिस २ : १९ -२१**

१. हया अध्यायातील भागातुन ख्रिस्ती लोकांनी सामाजिक व जातीय अडखळणांना कसे पाहावे ?

२. हया वचनांनुसार, कोण पायवा आहे आणि कोण कोनशीला आहे ? (यशया २८:१६ आणि १करिन्थ ३ :११ देखील बघा)

३. १करिन्थ ३ : १६ नुसार ख्रिस्त कोठे राहतो ?

४. आज देवाचे मंदिर कोठे आहे.

## दिवस ६

**प्रकरण २ : “विश्वासणाऱ्यांचा दर्जा”**

**पाठ** : अध्याय २

**मुख्यवचन** : इफिस २ : १०, “आपण सत्कृत्ये करावी म्हणुन ख्रिस्त येशुच्या ठायी निर्माण केलेले असे आपण त्याची हस्तकृती आहो. ती सत्कृत्ये आपण आपला आयुष्य चालवावा म्हणुन देवाने ती पुर्वी योजून ठेवली.”

**विषय वाक्य :** पूर्वी आम्ही परराष्ट्रीय व देवापासुन दूर होतो, परंतु विश्वासणारे म्हणुन आम्ही देवाचे निवासस्थान ठरतो.

**जीवन तत्व :** देव आमच्या सोबत सदैव आहे आणि तो कधिही न सोडण्याचे वचन देतो.

**सारांश :** अध्याय २ ची सुरुवात ख्रिस्ताचे क्रुसावरील कार्यापूर्वी आमची आध्यात्मिक स्थिती विषयी सांगते. पतन पावलेले मनुष्यत्व आम्ही आध्यात्मिकरीत्या मृत होतो. आम्ही देवास आज्ञा मोडणारेच् नव्हे तर त्याच्यामध्ये मृत पावलेले होतो. आम्हामध्ये आध्यात्मिक जीवन नव्हते. दुष्टता ही आमचे कृत्ये नव्हे तर आम्ही स्वतः असे होतो. आम्ही देवाचे वैरी होतो. सैतानाशी जुळलेले आणि क्रोधाची संतान होतो. ही वाईट बातमी आहे आणि तिला पुन्हा म्हटल्या जाऊ शकत नाही. परंतु हेल्लेणी म्हणुन, ही बातमी खालच्या स्तरावर जाते आम्ही देखील ख्रिस्त विरहित, इस्राएलाच्या राष्ट्राबाहेरचे, वचनाच्या करारास परके, आशाहीन, देवविरहित असे जगात होतो. (वचन १२ )

सुदैवाने पौल वाईट बातमीला उंच उचलणाऱ्या आशेने व्यत्यय आणतो. हयामध्ये चांगली बातमी वाईट बातमीवर वरचढ ठरते. "तरी देव दयासंपन्न आहे. म्हणुन आपण आपल्या अपराधामुळे मृत झालेले असतांही त्याने आपल्यावरील स्वतःच्या अपरंपार प्रेमामुळे, ख्रिस्ता बरोबर जिवंत केले - (कृपेने तुमचे तारण झालेले आहे.)" (२:४-५) ख्रिस्ताच्या वधस्तंभ आणि रक्ताव्दारे आमचा देवासह समेट झाला आहे. आम्ही मृत झालो होतो तरीही त्याजवळ करण्यात आलो. आम्ही वैरी

होतो तरीही देवासह शांतीमध्ये, ख्रिस्ताव्दारे त्याच्याजवळ करण्यात आले आहो. हे देवाच्या कृपेमुळे आपल्या वरील ममते मुळे घडले. हे आम्ही काही केले त्यामुळे नव्हे. जसे वचन ८-९ सांगते, तारण देवाच्या कृपेचे वरदान आहे आणि ते कर्मांनी प्राप्त केले जाऊ शकत नाही पण त्यानुसार जगण्याव्दारे ! पौल हया परिच्छेदाचे समापण हया आठवणींनी करतो की देवाने आमच्यासाठी तारण सुरक्षित राखले आहे. हयासाठी की आम्ही फळ आणावे.

वचन ११ ची सुरुवात तर सुवार्ता अधिक उत्तम बनत जाते. ज्याप्रमाणे आमचा देवासह समेट झाला आहे तसाच आमचा एकमेकांसोबत देखील समेट घडला आहे. परराष्ट्रीय असता आम्हांस देखील कराराचे लोक म्हणुन समनागरिकत्व आणि बंधुत्व देण्यात आले आहे. ख्रिस्ताच्या कृत्याने आम्हास देवासह आणि एकमेकांसह शांति मिळाली आहे. तीने विभाजनाच्या वैरभावाची भिंत, व्यवस्था ढासळून दोन गटांना एकत्र आणले आहे. सुरुवातीपासुन ही देवाची इच्छा होती की सर्वांना एकदेहा मध्ये एकत्र करावे. वचन २०-२१ पौल सांगतो की, आम्ही ख्रिस्त जो मुख्य कोनशिला आहे व्दारे पवित्र मंदिर म्हणुन रचिले गेलो आहोत. वधस्तंभावर यहुदी आणि हेल्लेणी मधील सर्व बाधा मोडण्यात आले. आम्ही आता "एक नवा मनुष्य" आहोत. राष्ट्र, जात, रंग, सामाजिक दर्जा, राजकारण आणि संस्कृती हयांमधील विभाजनाने आपल्या जगाला वैरभाव आणि भयाने घेरले आहे. तरीही ख्रिस्तीजनांमध्ये ते मोडण्यात आलेले आहे. आपण ख्रिस्ताच्या वधस्तंभ व रक्तामुळे एक कुटुंब, भाऊ आणि बहणी, देवाची लेकरे  झालो आहोत. काय तुम्ही चुकीने स्वतःला ख्रिस्तामध्ये तुमच्या भाऊ आणि बहीणींपासुन विभक्त केले आहे ?

**देव सदैव आमच्या सोबत आहे आणि तो आम्हाला कधीही न सोडण्याचो वचन देतो.**

# इफिसकर : ख्रिस्ताचे शरीर

## प्रकरण १ : अध्याय ३

**विषय वाक्य :** देवाचा हेतु आता मंडळीव्दारे प्रकट केला आहे.

### दिवस १

**वाचा इफिस ३ : १-६**

१. रोममध्ये बेडयांमध्ये पौल असे का म्हणतो की तो ख्रिस्त येशुचा बंदिवान आहे. ? (३:१)

२. दुसऱ्या पिढीमध्ये पूर्वी कोणते रहस्य ठाऊक नव्हते ?

३. यहुद्यांना हे रहस्य स्विकार करणे कठीण का आहे ? (रोम १६ : २५-२६ हे देखील बघा)

४. यहुदी आणि हेल्लेण्यांमध्ये आता एकसमान काय आहे ?

### दिवस २

**वाचा इफिस ३ : ७-१३**

१. वचन ८ पासून पौलाचे पाचारण कोणते ?

२. वचन ९-१० नुसार देवाचे ज्ञान कोणास प्रगट करण्यात आले ?

३. आता आम्ही देवाजवळ कसे जाऊ शकतो ?

### दिवस ३

**वाचा इफिस ३ : १४-२१**

१. आपल्या प्रार्थनेचे पौल कोणते कारण सांगतो ?

२. पौल आपल्या प्रार्थनेत कोणत्या गोष्टींची मागणी घालतो ?

३. अशी प्रार्थना, ज्यांना तुम्ही ओळखता, करु इच्छिता काय ?

४. तुमचे प्रार्थनामय जीवन वचन २० वर विश्वास करीत कसे बदलू शकते ?

## दिवस ४

**वाचा इफिस ३:१४-२१**

१. आपल्या ऐश्वर्याच्या समृध्दी प्रमाणे देवाने तुम्हाला भरण्याकरीता तुम्ही कोणती विनंती करणार ?

२. देवाच्या ऐश्वर्याच्या समृध्दी प्रमाणे जेव्हा एक व्यक्ती भरल्या जातो तेव्हा आपल्या घरामध्ये, घराबाहेर आणि दैनंदिन जीवनात कसा दिसतो याचे वर्णन करा ?

## दिवस ५

**वाचा इफिस ३ : २०-२१**

१. तुम्ही देवाला जे मागीतले त्यापेक्षा तुम्हाला त्याने भरपूर दिले आहे काय ? त्याचे वर्णन करा ?

२. कोणते सामर्थ्य आम्हा मध्ये कार्य करते ?

३. २०-२१ नुसार तुम्ही देवा विषयी काय शिकता ज्यातुन आज तुम्ही जेथे आहा मदत मिळते ?

## दिवस ६

**प्रकरण ३ : "मंडळीचे रहस्य"**

**पाठ :** अध्याय ३

**मुख्यवचन :** इफिस ३ : ६, " ते रहस्य हे की, परराष्ट्रीय ख्रिस्त येशूच्या ठायी सुवार्तेच्या योगाने आमच्या योगाने वतन बंधु, आमच्या बरोबर एक शरीर व आमच्या बरोबर अभिवचनाचे वाटेकरी आहेत."

**विषय वाक्य :** देवाचा हेतु आता मंडळीव्दारे प्रगट आहे.

**जीवन तत्व :** आम्ही आता मृत नाही परंतु आपल्या कृपेची कथा सांगण्यास जीवंत आहोत.

**सारांश :** परिचयातील गोष्टींकडे वळतांना पौल ख्रिस्त येशूचा बंदिवान आणि हेल्लेण्यांकरीता कृपेचा प्रचारक म्हणुन आपले लिहीण्याचे कारण स्पष्ट करतो. तो इफिसकरांना पुन्हा खात्री करुन देतो की, हा संदेश पवित्र आत्म्याच्या प्रकाशनाव्दारे देव पित्या पासून त्याला थेट प्राप्त आहे. तो दोन उत्तेजित सत्य प्रकट करतो. पहिले, व्यवस्थे करीता असलेली आवश्यकता ख्रिस्ताने पूर्ण केली आणि अशा प्रकारे यहुदी किंवा हेल्लेण्यांना तिच्या बंधनात असणे खारीज केले आणि दुसरे, हेल्लेणी यहुद्यांच्या पायखुणावर उभे आहेत, येशु सोबत सहवारस म्हणुन. सर्व मनुष्य सर्व ठिकाणी त्यांची वंशावळ किंवा जुळवणुकीची पर्वा न करता देवासमोर समान जागेवर आहेत. ख्रिस्त येशुमधील विश्वासाच्या आधारावर राज्यात सर्वांचे स्वागत आहे. या महान करुणेचे रहस्य भूतकाळात जगाला प्रगट नव्हते. तरीही, जुन्या करारात त्याचे ओझरते दर्शन होते. (उदा. अब्राहामासोबतच्या करारात सर्व राष्ट्रांसाठी आशिर्वादाची प्रतिज्ञा होती.) पंरतु जेव्हा पूर्णत्वाचा काळा आला, देवाने प्रेषित पौलाला निवडले, जो प्रेषितांमध्ये स्वतःला सर्वात खालचा समजतो, हयासाठी की देवाच्या ज्ञानाच्या प्रकाशाने त्याने विजेता बनावे आणि यहुद्यांसमान हेल्लेण्यांपर्यंत न्यावे. हया मोठया रहस्यातील रमणीय प्रकाशनाच्या उजेडात अध्याय ३ ची समाप्ती पौल आणखी एका प्रार्थनेने करतो. तो पित्यासमोर झुकतो आणि विनंती करतो की, आम्ही पवित्र आत्म्याव्दारे आपल्या आत्म्यात अधिक शक्तीमान व्हावे अशासाठी की, बुध्दीस अगम्य अशी ख्रिस्ताची प्रिती आम्ही ओळखावी हयासाठी की, देवाच्या सर्व पूर्णते इतके परीपुर्ण व्हावे. आमच्या जीवनात परमेश्वर जसे पौलाच्या प्रार्थनेचे उत्तर देतो तसे हया जगामध्ये आम्ही देवाचे साधन त्याची योजना प्रगट करण्याकरीता आणि त्याची कृपा सादर करण्याकरीता ठरुया.

आम्हापैकी प्रत्येकाची आपल्या जीवनातील देवाच्या कृपेची एक विशिष्ट गोष्ट आहे. पौल आपल्या कृपेच्या गोष्टींना "देवाचे नानाविध ज्ञान" असे म्हणतो. ते विलक्षण तऱ्हेने उत्कृष्ट रंगाने चकाकते. प्रत्येक जन भिन्न आहे. परंतु प्रत्येक चित्रात महत्वाचा असून देव कोण आहे, तो लोकांच्या जीवनात कसे कार्य करतो, आणि तो लोकांना आपल्या कडे कसे ओढतो.

ख्रिस्ताव्दारे मिळविलेली त्याची ही सार्वकालिक योजना संजीवित प्रस्तुतीकरण आहे. एके दिवशी ह्या सर्व कथा मिळवून एक संपूर्ण गोष्ट तयार होईल जी सैतानाची फौज आणि पापाचा विनाश हयापेक्षा सुंदर आणि विजयाची असणार. जेव्हा इतर लोक देवाची कृपा जे प्रत्येक जमातीत, प्रत्येक बोली आणि प्रत्येक राष्ट्रांतून देवाच्या लोकांच्या अंतःकरणात बघतील तेव्हा ते परीवर्तीत होतील.

**आम्ही आता मृत नसुन आपल्या कृपेची कथा सांगण्याकरीता जीवंत आहोत.**

# इफिसकर : ख्रिस्ताचो शरीर

## प्रकरण १ : अध्याय ४

**विषय वाक्य : एकते करीता आम्ही रचलो गेलो आहोत आणि सेवेकरीता एक शरीर होण्याकरीता वरदान प्राप्त आहोत.**

### दिवस १

**वाचा इफिस ४ : १-३**

१. आपल्या पाचरणास शोभेल असे चालण्यास पौल काय म्हणतो ?

२. कोणत्या एकतेला आम्ही सुरक्षित केले पाहिजे ?

३. ती आम्ही कशी सुरक्षित राखावी ?

४. मुळ विश्वास समर्पित न करता कोणकोणत्या मार्गानी एकतेतील शांति तुम्ही राखुन ठेवू शकता?

### दिवस २

**वाचा इफिस ४ : ४-१०**

१. या वाचनानुसार आपण आपसात काय वाटतो ?

२. आपल्या पाचरणात तुम्ही क्रियाशील आहात काय ?

३. नीतिसुत्र ६ : १६-१९ नुसार आपण काय टाळावे ?

४. सर्वांवर, सर्वांमध्ये, सर्वांव्दारे कोण जगत आहे ?

### दिवस ३

**वाचा इफिस ४ : ११ - १३ आणि १ करिन्थ १२ : १ - ११**

१. कोणी ठरविले की, कोणास कोणते वरदान असावे आणि ते कसे दिसावे ?

२. ख्रिस्ताने मंडळीला कोणते दान दिलेले आलेले आहेत त्यांची नावे लिहा ?

३. जे दान आम्हास प्राप्त आहे त्या विषयी आमची जवाबदारी कोणती ?

४. हया अध्यायातील प्रत्येक प्रकारच्या एकते करीता खाली दिलेल्या शब्दानुसार वचने लिहा.

अ. एक शरीर

ब. एक आत्मा

क. तुमच्या पाचरणाची आशा

ड. एक प्रभू

इ. एक विश्वास एक बाप्तिस्मा

फ. एक देव आणि सर्वांचा पिता

(रोम १ : १७, ६:३-४, ८:९, १०:९-१२ १ करिन्थ ८:६,१२:१३, इफिस १ : १३-१४, १७:१८, फिलीप्पै. २ :११, कलस्सै १:१-१८, १ थेस्स. ४ : १५-१८, तिताला २ :१३, १योहान ३ :३, यहुदा ३)

५. एकतेतील लक्ष्य कसे दिसुन पडते ? (वचन १३)

## दिवस ४

### वाचा इफिस ४ : १४-१६

१. खालील गोष्टी तुम्ही आपल्या जीवनात कशा उतरविणार:

अ. सत्य बोलणे (सुवार्तेचा संदेश) ?

ब. प्रितीत सत्य बोलणे ?

क. सर्व गोष्टीमध्ये ख्रिस्तात वाढणे ?

ड. संपूर्ण देहाला मदत पुरविण्याकरीता देहात एक सांधा बनणे ?

## दिवस ५

### वाचा इफिस ४ : १७-३२

१. वचन १७ -३२ नुसार खालील तक्ता पुर्ण करा.

| जुन्या जिवीतक्रमाचा त्याग करा. | नविन जिवीतक्रम धारण करा. |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |

| | |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

२. जे तुम्ही वाचले, आणि वर यादी तैयार केली, त्या आधारावर ख्रिस्तामध्ये नविन जीवनाचे तुम्ही कसे वर्णन करणार ?

३. सैतान आपल्या जीवनावर कसं पाय टाकतो ? हयाचा अर्थ काय ?

४. हया आठवडयात तुम्ही कोणते भिन्न कार्य करण्यास सुरुवात केली आहे ?

## दिवस ६

## प्रकरण ४ : "शारीरीक जिवन"

**पाठ** : अध्याय ४

**मुख्यवचन :** इफिस ४ : १, “तुम्हाला झालेल्या पाचारणास शोभेल असे चाला;”

**विषय वाक्य** : आम्ही एकतेकरीता रचलेले आणि सेवे करीता देणगी प्राप्त असे आहोत.

**जीवन तत्व** : आपल्या पाचारणास शोभेल असे जीवन जगण्याकरीता स्वार्थीपणाचे जुनेपण सोडुन नविन स्वभाव धारण करावा.

**सारांश :** आपल्या पत्राच्या पहिल्या भागातील धर्म विज्ञान सिध्दांतांपासुन पौल आता प्रायोगिकरणाच्या दुसऱ्या टप्प्याकडे वळतो. जो नीतिमत्वासाठी असलेला बंदिवान आम्हांस आव्हान करतो की, "पाचरणास शोभेल असे चाला". त्याचे बंदी होणे हा वाईटपणाचा निकाल नव्हता, परंतु देवाच्या राज्याचा नागरीक म्हणुन आणि त्याच्या गौरवपणासाठी त्याने त्रास सहन केला आणि जसे पौलाने सुवार्तेस आपल्या बंदी होण्यास योग्य समजले तसेच तो आम्हांस सांगतो की आम्ही हया जगाच्या गोष्टी बाजुला ठेऊन आपल्या अपेक्षा देवाच्या गोष्टींवर अपेक्षित ठेऊन आपले आचरण प्रकट करावे. ख्रिस्तामध्ये आम्ही जीवंत करण्यात आलेले आहोत आणि त्याचे फळ ख्रिस्ताच्या चारित्र्याचे प्रतिबिंब आहे.

नवीन सृष्टी म्हणुन, दररोज नवे होत जाणे, सर्वांना पाहता यावे असा नवीन मनुष्य धारण करण्यास आम्ही आमंत्रित आहोत. हयामध्ये दीनता, सौम्यता, धैर्य, एकमेकांना सहन करणे आणि अति महत्वाचे म्हणजे आपल्या ऐक्यातील शांति राखणे होय. नंतर तो फिरुन सांगतो की, आपण ख्रिस्ताचे शरीर आहोत, म्हणून आपली आपसांत एकता आहे. आपण एकाच प्रभूचे, समान पाचारण, समान आशा, समान विश्वास आणि समान बाप्तिस्माचे वाटेकरी आहोत.तरीही जेव्हा आपण ख्रिस्तामध्ये एकता आणि समानतेचा आनंद घेतो, तरी आपण एकसारखे नाही. ख्रिस्ताव्दारे मंडळीला देणग्या देण्यात आल्या आहेत, जसे प्रेषित, संदेष्टे, सुर्वातिक, पाळक आणि शिक्षक - हयासाठी की, त्यांनी देवाच्या जणांना हया जगात सेवेच्या कार्याकरीता तैयार करावे आणि परिपक्वतेत वाढावे. ही वरदान पुढे रोमकरांस १२ आणि १ करिन्थ १२ मध्ये अधिक स्पष्ट केली आहेत. हया वरदानांचा नैसर्गिक कलाकौशल्य किंवा योग्यतेसह गैरसमज करुन घेऊ नये. पवित्र आत्माव्दारे सर्व सत्तेने आणि अलौकीकतऱ्हेने विश्वासणाऱ्यांवर ही सोपविण्यात आलेली आहेत. (१ करिन्थ १२ : ७, ११) ते मंडळीच्या रचनेकरीता (ख्रिस्ताचे देह) देण्यात आले आहे आणि सर्व विश्वासणाऱ्यांच्या कार्याकरीता. हे वरदान आम्हाला विभाजित करण्याकरीता नव्हे पंरतु ख्रिस्ताच्या देहांत एकीकरणाकरीता आहेत.

एकमेकांकरीता आपली प्रिती ही वरदांनांच्या उपयोगापेक्षा अधिक महत्वाची आहे. त्याचप्रमाणे आपले स्वतंत्रपणे काम करण्यापेक्षा एकत्रपणे काम करणे अधिक महत्वाचे आहे. आपले स्वतंत्र अवलंबून असण्यापेक्षा एकमेकांवर अवलंबून असणे महत्वाचे आहे. जसे शरीरातील प्रत्येक अवयव आपले कार्य करते तेव्हा शरीर वाढेल आणि परिपक्वतेस प्राप्त करील. आपले कार्य, आपल्या उपजीविकेचे माध्यम - येशु ख्रिस्ताने हया पृथ्वीवर ठेवण्याचे कारण आणि सोडण्याचे कारण हे आहे की, आम्ही आपली दाने शोधावी आणि उपयोगात आणावी. तसे करतांना आपण मंडळीची इच्छा पूर्ण करु, पवित्र जणांच्या सेवेच्या कार्याकरीता वा ख्रिस्ताच्या शरीराची रचना पूर्णतेस नेण्याकरीता सिध्द करावी. (इफिस ४ : १२-१३) काय तुम्ही आपले वरदान जानता आणि ख्रिस्ताच्या देहाकरीता ते कसे वापरता आणि उपयोगी आणता ?

आम्हा विश्वासनाऱ्यांकरीता पौल मनाचे आणि ओळखिचे मोठया परीवर्तनाविषयी बोलतो. देवा करीता आम्ही एकदा मेलेलो होतो आणि भ्रष्ट मनाने दैहिकतेकरीता वाहीलेले होतो. परंतु ख्रिस्तामध्ये आम्हास नवी ओळख प्राप्त झाल्यामुळे आम्ही सांसारिकतेनुसार जगणे नाकारतो आणि ख्रिस्ताचे अनुकरण करणाऱ्या गोष्टींना उपयोगात आणतो.

| जुन्या जिवितक्रमाचा त्याग | नविन जिवितक्रम धारण |
|---|---|
| खोटेपणा | सत्य |
| व्देष किंवा राग राखणे | राग करा परंतु पाप करु नका |
| चोरी करणे | मेहनत करा आणि वाटा |
| अभद्र भाष्य | शिक्षणास बोध करणारे कृपायुक्त शब्द |
| क्रोध, व्देष आणि राग | एकमेकास क्षमा करा |
| निंदा आणि मत्सर | मृदु स्वभावाचे आणि दयाळू असा |

**आपल्या पाचारणास शोभेल असे जिवन जगण्याकरीता स्वार्थीपणाचे जुनेपण सोडुन नवीन स्वभाव धारण करावा.**

# इफिसकर : ख्रिस्ताचे शरीर

## प्रकरण १ : अध्याय ५

**विषय वाक्य : देवाचे अनुकरण करतांना आपण उजेडात जगतो आणि प्रितीत वागतो.**

### दिवस १

**वाचा इफिस ५ : १-२**

१. देवाचे अनुकरण करण्याकरीता, मागे चालण्याकरीता कोणाचे जिवन आपण पाहतो ?

२. देव आपली त्याग करणारी प्रिती आम्हासाठी कशी दाखविती ?

३. प्रितिमय जिवनाचे वर्णन करा (१ करीन्थ १३ : ४-७ आणि १ योहान ३ : १६ हे देखील बघा.)

### दिवस २

**वाचा इफिस ५ : ३-९**

१. देवाच्या लोकांमध्ये कोणती वागणूक आणि स्वभाव दिसून पडू नये ?

२. देवामागे चालणाऱ्या व्यक्ती मधिल चिन्ह कोणते ?

३. जगामध्ये उजेडाचे लोकं काय परावर्तीत करतात ?

### दिवस ३

**वाचा इफिस ५ : १०-१३**

१. प्रभु कशाने आल्हादित होतो हे आम्ही कसे जानावे?

२. काळोखांच्या कृत्यांवर उजेडाचा कोणता प्रभाव पडतो?

३. विश्वासणाऱ्यांव्दारे हे घडतांना आज तुम्ही पाहता काय? कां किंवा कां नाही?

## दिवस ४

**वाचा इफिस ५ : १४-२०**

१. वचन १४, १५ आणि १७ नुसार उजेडात न चालणाऱ्या विषयी पौल कसे वर्णन करतो ?

२. या वचनानवर आधारीत आपण हुशारीने कसे जगतो ?

३. पौल म्हणतो आम्ही द्राक्ष रसाने मस्त होऊ नये पण पवित्र आत्म्याने परीपुर्ण व्हावे काय ही योग्य तुलना करणे होय?

४. हया वचनाननुसार एक विश्वासी आत्म्याने भरलेला असतो हयाचे वर्णन करा.

## दिवस ५

**वाचा इफिस ५ : २१-३२**

१. वचन २१ चा अर्थ काय ? शास्त्र भागातील हया विभागाचे मुख्यवचन हे का आहे ते बघा?

२. पत्निंव्दारे, पतींव्दारे पौल कोणत्या त्यागाची मागणी घालीत आहे?

३. हया शास्त्र भागात पौल कोणत्या मोठया रहस्याचे वर्णन करीत आहे?

४. तुम्ही आपल्या समाजात विवाहातील अशा एकमेकांस समर्पनातील प्रतिबिंब पाहु शकता काय?

५. हया अध्यायातुन देवाने तुम्हास स्पष्ट केलेली एक गोष्ट निवडा आणि तेथे ति सांगा.

## दिवस ६

### प्रकरण ५: "उजेडात चाला"

**पाठ** : अध्याय ५

**मुख्यवचन :** ५:२१ "ख्रिस्ताचे भय बाळगुन एकमेकांच्या अधीन असा"

**विषयवाक्य :** देवाचे अनुकरण करणारे म्हणुन, आम्ही उजेडात जगतो आणि प्रितीने चालतो.

**जिवनतत्व :** जेव्हा पवित्र आत्मा आमच्या जिवनावर नियंत्रन राखुन आहे. तेव्हा आम्ही नकारात्मक वागणूक आणि कार्य ख्रिस्त समान वागणुक आणि कार्यामध्ये बदलुन देतो.

**सारांश :** प्रत्येक विश्वासी जसे आपले कार्य सिध्दीस नेतो तेव्हा ते परीपक्वतेकडे वाढतात. हया परीपक्वतेत नकारात्मक विचार पध्दती कठोर अंतःकरण, असंवेदनशिलता, इंद्रियदमन अशुद्धता, लोभी, इच्छा, खोटारडेपणा, पापाने भरलेला राग, चोरी, अभद्रभाषण, द्वेष, संताप आणि राग, निंदा, मत्सर, अनैतीक्ता, लोभ, विभत्सपणा, मुर्खपणाचे बोलने, निच स्थराचा विनोद, मुर्खपणा, अंमलीपणा, दुर्व्यसनपणा हयांचा त्याग असतो. पौल आम्हास आठवण करुन देतो की, आम्ही गोंधळलेले, आशारहीत असता अंधारात चालत होतो. परंतु आता आम्ही उजेडात चालतो आणि आध्यात्मीक विचाराकरीता आपल्या मनाचा उपयोग करतो. आध्यात्मीक स्तरावर आपल्या मनाचे नविनीकरण देवाच्या वचनासोबत पवित्र आत्म्याच्या वस्तीतील उपस्थिती द्वारे शक्य होते.

पवित्र आत्मा जसे आपले विचार बदलतो तेव्हा आपण जगण्याची नवीन पद्धत स्विकार करतो. आपली वागणुक आणि क्रिया भिन्न होवून जातात. आपण देहाचे कार्य व विचार बाजुला करण्यास सुरुवात करतो आणि त्याऐवजी नितीमत्वचा आणि पवित्रता, खरेपणा, मेहनत वाटणे, दया, क्षमा, प्रिती, आभार, चांगुलण, सत्य, ज्ञान, प्रत्येक संधीचा लाभ घेणे, देवाच्या इच्छेस समजने, आत्म्याने भरलेले, हर्षाने देवाची आराधना, एकमेकांस समर्पण करने प्रारंभ करतो. निश्चित परीवर्तनातील हया प्रक्रीयेस आमचे सर्व आयुष्य लागेल. परंतु आज, आम्ही देवास कुठुन

प्रारंभ करावा हया बद्दल विचारु शकतो, आम्हास बदलण्याची गरज मान्य करु शकतो आणि पवित्र आत्म्याच्या स्वाधीन होवून पुर्वी न पाहीलेल्या बदलास सोपवू शकतो. पवित्र आत्म्यास खेद पहोचवू नये परंतु आम्हामधील त्याच्या कार्यास देवाचे गौरव चकाकण्याकरीता परवानगी देवू शकतो. जसा उजेड अंधारावर पडतो आणि सत्य उघडकीस आणतो तसेच देवाचा उजेड आम्हामध्ये लोकांकरीता देवाचे सत्य उघडकीस आणेल. ते आम्हामध्ये अंतर पाहतील. ते पाहतील की आम्ही देवाचे आहोत.

जसे आम्हास जगण्याचा वेगळा मार्ग देण्यात आला, तसाच आम्हास प्रितीचा वेगळा मार्ग देण्यात आलेला आहे. हया मार्गातील सवीस्तर विवरणानंतर आम्हास विश्वासणाऱ्यांच्या समुदायापुरते विचार व वागणुक रोखायची आहे, हयावरुन पौल अध्याय ५ संपवून अध्याय ६ कडे प्रितीच्या आपल्या वर्तुळातील चलण्याचे विवरण देतो. थोडक्यात तो म्हणतो की आम्ही देवामधील आपला विश्वास आणि "ख्रिस्ताकरीता एकमेकाप्रती अधिन" असण्यास क्रियाशिल असावे. हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा आपण ख्रिस्त "आपले मस्तक" हयाच्या अधीन असू. देव आमच्यावर ज्यांना नेमतो त्यांना अधीन असावे आणि जे आमच्या अधीन आहेत त्यांना सौम्यतेने नेतृत्व दयावे. लक्षात असु दया की विधर्मी जनांकरीता जी प्रिती आणि काळजी त्याने दर्शविली त्यावेळी तो स्वतः बंदी होता. आणी बंदी असतां त्याच्या देखरेखीतील लोकांकरीता काळजी वाहक होता. ज्यांचे त्याने देवाच्या राज्यात स्वागत केले त्यांना शिक्षण उत्साह देण्याकरीता स्वतःचे सुख बाजुला ठेवले.

अध्याय ५:२२ - ६:९ शास्त्र भागातील हा सोपा परीच्छेद नव्हे. परंतु ही वचने मनुष्याच्या दुष्टपणास पसंती देणारी नव्हे. देव दोष लावणारा नाही आणि पौल हया दुरुपयोगाची परवानगी देत नाही. मनुष्याच्या धमकी समान नव्हे जे आम्ही मंडळीत आणी संसारात पाहीले खरेतर ख्रिस्ताने दोघांचा विरोध केला आहे. अनेकदा त्याने परुश्यांना आवेशाने त्यांच्या वाईट वागणुकी बद्दल सुधारना केली आहे. आणि मत्तय २० : २५-२८ मध्ये त्याने आपल्या शिष्यास चांगल्या पुढारीपणा बद्दल सुचीत केले आहे.

खात्री ठेवा हे निर्देश चांगले तत्व किंवा मुल्याचे पडसाद नव्हे. ख्रिस्तामध्ये आपण एक समान, सहवारस आणि देवाच्या कृपेचे कारभारी आहोत. अध्याय ४ मध्ये सांगीतल्या प्रमाणे आम्ही एक प्रभु एक आत्मा आणि एक पाचारण आपसात वाटतो तरी देवाच्या ऐश्वर्य ज्ञानाने वेगवेगळया मार्गाने एकमेकांवर प्रिती करण्यास बोलाविले आहोत. जसा ख्रिस्त पित्याच्या अधीन राहीला आणि आम्हासाठी त्याग केला त्या प्रमाणे आम्हास एकमेकांच्या अधीन ख्रिस्त जो आमचा मस्तक हयाच्या अंतर्गत प्रितीत सेवा करण्यास सांगण्यात आले आहे.

**जोव्हा देवाचा आत्मा आमच्या जिवनाचा नियंत्रक आहे, तोव्हा आमची नकारात्मक वागणूक आणि क्रिया ख्रिस्त समान वागणूक आणि क्रियेत बदलून जाते.**

# इफिसकर : ख्रिस्ताचे शरीर

## प्रकरण १ : अध्याय ६

विषय वाक्य : आध्यात्मिक युध्दाच्या घेरावासाठी देव आम्हास युध्दाची शस्त्र सामग्री पुरवितो.

### दिवस १

**वाचा इफिस ६ : १-४**

१. ही आज्ञा लिहुन काढा जी प्रतिज्ञेसह प्राप्त होते. (अनुवाद ६: १-२)

२. प्रायोगिकरित्या हे कृतीत कसे उतरवू शकतो ते स्पष्ट करा?

३. आई-वडील आपल्या लेकरांना कसे चिरडीस आणू शकतात?

४. आई- वडीलांना कोणते महत्वाचे निर्देश प्राप्त आहेत?

५. आपल्या लेकरांना शिकविण्या करीता तुम्ही काय करीत आहांत, जेणे करुन जेव्हा ते तुमची आज्ञा पाळतात तेव्हा ते देवाची आज्ञा पाळतात?

६. हि शिकवण तुमचे कुटुंब कसे उपयोगात आणित आहे ?

### दिवस २

**वाचा इफिस ६:५-९**

१. सरळ अंत:करणाने सेवा करणे म्हणजे काय वाटते ?

२. चांगले कार्य करण्याविषयी विश्वासणाऱ्यांना काय प्रवृत्त करते?

३. देवा सोबत पक्षपात नाही हयाचा अर्थ काय?

४. आपण इतरांना कसे दाखवू शकतो की, ख्रिस्तामध्ये आपण समान आहोत?

### दिवस ३

**वाचा इफिस ६: १०-१२**

१. वचन १०-११ मध्ये आम्हांस काय करण्यास सुचविले आहे?

२. आम्हांस कोणाचे बळ प्राप्त आहे ? त्याचा लाभ आम्ही कसा घेतो?

३. वचन ११-१२ नुसार , आम्ही युध्द करत असलेल्या आध्यात्मिक शक्तीचे वर्णन करा.

## दिवस ४

**वाचा इफिस ६: १३-१७**

१. विश्वासी म्हणुन देवाची शस्त्र सामग्री आम्ही का घालावी?

२. देवाच्या शस्त्र सामग्रीच्या प्रत्येक भागाची यादी बनवा, शरीरावर ते कोठे परीधान करणे आहे आणि त्यांचा हेतु.

३. कोणत्या आज्ञेची पुनरावृत्ती आहे? अनेकदा तिचा वापर का करण्यात आला आहे?

## दिवस ५

**वाचा इफिस ६ : १८-२४**

१. का आणि केव्हा पौल प्रार्थना करावयास सांगतो? (बघा वचन १८)

२. पौलाची स्वत:विषयीची प्रार्थना विनंती (१९) त्याची प्राथमिकता काय सांगते?

३. तुमच्या सभोवती असणाऱ्यांनी तुमच्या साठी कशी प्रार्थना करावी. असे तुम्हास वाटते ?

४. या भागातुन देव तुम्हास काय सांगत आहे? तुम्ही प्रतीउत्तर कसे देणार ?

५. त्याने तुम्हास जे सांगितले आहे त्या विषयी तुम्ही काय करणार ते लिहा.

## दिवस ६

**प्रकरण ६: “देवाची शस्त्रे धारण करा”**

**पाठ** : अध्याय ६

**मुख्यवचन** : ६:१३, “हया कारणास्तव तुम्हाला वाईट दिवसात प्रतिकार करीता यावा व सर्वकाही केल्यावर टिकाव धरता यावा म्हणुन देवाची शस्त्र सामग्री घ्या.”

**विषय वाक्य** : आध्यात्मिक युध्द जे आम्हास घेरते त्याकरीता देव आध्यात्मीक शस्त्र सामग्री पुरवितो.

**जिवनतत्व** : विजयात दृढ राहण्याकरीता प्रार्थना आणि वचन हे सामर्थी शस्त्र आहेत.

**सारांश :** अध्याय ६ मधील पहील्या दहा वचनांत पौल आपले शिक्षण अधीकारी आणि अधीनता विषयी सतत पुढे सुरु ठेवतो. सुचनांच्या प्रत्येक घटकात तो आव्हान करतो की, आमची प्राथमिकता देवावर अवलंबुन आहे. जो सर्वांवर श्रेष्ठ आहे आणि इतरांना वागणुक देण्याविषयी तो आम्हास जवाबदार ठरविल.

पौलाच्या सुचनातील प्रिती आणि नम्र त्यागातुन एकमेकांस अधिन असण्यातील उच्चता, पौल मंडळीच्या एक सैनिकाच्या चित्राचा शेवटचा परीचय देतो. आम्ही नम्र होण्यास बोलाविण्यात आलेले आहोत परंतु नाकारलेले अशक्त नव्हे. अध्याय ५:१४-१६ मध्ये पुन्हा तो म्हणतो , " हे निद्रीस्ता जागा हो व मेलेल्यातुन उठ म्हणजे ख्रिस्ताचा प्रभाव तुझ्यावर पडेल म्हणुन अज्ञानासारखे नव्हे ज्ञान्यासारखे सभोवार नजर ठेवुन जपून चाला, वेळचा सदुपयोग करा, कारण दिवस वाईट आहेत." खरोखर आमचा युध्दाच्या काळात जन्म झाला आहे. या जगात आम्हास शत्रु आहेत ही गोष्ट आम्हास आश्चर्यात टाकु नये. परंतु पौला नुसार आपला शत्रु जाणने हे पुरेसे नाही. युध्दा करीता आम्हास आपली शस्त्र सामग्री माहीत असावी. आणि नेहमी आम्ही प्रार्थनेत दक्ष असावे. देवाने आम्हा करीता तयार केलेली शस्त्र सामग्रीचे पौल परिचय करुन देतो, सत्य, ख्रिस्तादवारे आम्हास मिळणारे नितिमत्व, शांतीची सुवार्ता, विश्वास, तारण आणि देवाचा पवित्र आत्मा. देवाच्या शस्त्र सामग्रीला परधिान करुन आणि आत्म्यात प्रार्थना करीत आपल्या शत्रुच्या विरोधात आम्हास पुर्ण संरक्षण प्राप्त आहे. "हया कारणास्तव तुम्हाला वाईट दिवसात प्रतिकार करीता यावा व सर्वकाही केल्यावर टिकाव धरता यावा म्हणुन देवाची शस्त्र सामग्री घ्या."(इफि. ६:१३)

सैनिकाचा हेतु कोणता, केवळ लढणे. निश्चित हेच परमेश्वर आम्हा मध्ये करीत आहे. त्याच्या आत्म्याद्वारे ते सामर्थ्य आम्हामध्ये वस्ती करते तीच युध्दाची मजुरी होय आणि आम्हासाठी हा किती मोठा आशिर्वाद की आम्ही त्याच्या विजयाचे भाग असावे. बोलावलेल्यांचा आणि प्रत्येक आध्यात्मिक आशिर्वाद प्राप्त कर्त्यांचा हा विशेष अधीकार आहे. जेणे करुन एक असे देह ज्याचे मस्तक ख्रिस्त, असे मंदीर ज्यामध्ये ख्रिस्त राहतो, उलगडलेले रहस्य जे सर्वांनी पाहावे, वागणुकीत व क्रियेत  नवा मनुष्य, उजेड जो स्पष्टपणे दिसेल आणि एक सैनिक जो आमच्या पुढे

जावुन आम्हा करीता ज्याने युध्द जिंकले विश्वास योग्य राहुन मृत्युचा सामना केला असे असावे. येशुकरीता प्रत्येक आशिर्वादासाठी सज्ज आणि जे बोलाविलेले आहे त्यांकरीता हा विशेष अधिकार आहे. हेच पाचारण होय.

## विजयांमध्ये स्थिर उभे राहण्यास प्रार्थना आणि वचन ही सामर्थी शस्त्र आम्हास मदत पुरवितात.

# फिलिप्पैकरांस : पूर्ण आणि सार्थ जिवनाचे रहस्य

## लेखक

पौल, एक यहुदी आणि मंडळीचा भूतपूर्ण छळ करणारा, हेल्लेण्यांनकरिता येथू ख्रिस्ताची सूवार्ता नेण्यास निवडलेला होता. प्रेषितांचे कृत्य ९ मध्ये दमिष्क वाटेवरील त्याच्या परिवर्तनाचा उल्लेख आहे. त्यावेळी ज्याला शौल म्हटल्या गेले, दमिष्कास ख्रिस्तीजनांना अटक करावयास निघाला होता परंतू पुनरूत्थीत ख्रिस्ताद्वारे अडवीला गेला. त्याचा सत्या सोबत सामना झाला आणि त्यास नवीन नाव देण्यांत आले. त्याचे अंतःकरण आणि जिवनाची दिशा नेहमीकरीता बद्दलली गेली. मंडळीचा छळ करणाऱ्या पासून प्रेषित पौल म्हणून ओळखला गेला, आपण बघतो की सूवार्तेच्या सामर्थ्याने त्याचे जिवन आंतून बाहेर असे बदलले गेले. तो सर्वात महान मिशनरी आणि नवीन करारातील धर्म ग्रंथातील साहित्यात तो साहाय्यक ठरला. काय तूम्ही देवाचे ऐकण्यास इच्छूक आहा की, त्याने तुमची दिशा बदलावी ?

## वेळ

आपल्या जवळजवळ ११ वर्षांचा पहिल्या भेटीनंतर पौलाने फिलिपै येथील मंडळीला हे पत्र लिहीले. त्याने रोम मध्ये नजर कैदेत असतांना हे पत्र लिहीले, प्रेषित २८ : १६, ३०-३१. अध्याय २ : २०-२६ सांगते की सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाची वाट पाहता पौलास ठाऊक होते की, त्याच्या जिवनास जोखीम होती. हयास्तव त्याने १ : २१ मध्ये म्हटले, “कारण मला तर जगणे हे ख्रिस्त आणि मरणे लाभ आहे.” काय तुम्ही त्याच्या सोबत सहमत होणार?

## प्रेषक

मासेदोनिया जिल्हयातील फिलिपै एक रोमन कॉलनी होती, जो आज उत्तर ग्रिस म्हणून ओळखला जाते. तो मिश्रीत लोकांचा समुदाय होता, ज्यामध्ये अधिकतर अंधविश्वासी मुर्तीपूजेतून येशु ख्रिस्तावरील विश्वासांत परिवर्तन झालेले लोक होते. प्रेषित १६ : १ - १३ मध्ये आपण जवळून बघतो की, फिलीप्पै येथील मंडळी कशी सुरु झाली. पौलास एका मनुष्याचा दृष्टांत

“मासेदोनियात येऊन आम्हाला साहाय्य कर,” मिळाल्या नंतर पौल, सिला, डॉ. लुक आणि तिमथी एकत्र पौलाच्या दुसऱ्या मिशनरी प्रवासात जुळली. हया दृष्टांताचा परीणाम म्हणून त्यांनी आपली परिक्रमा बदलली आणि सवयीनुसार येशुची सूवार्ता सांगण्याकरीता सभास्थान शोधू लागले. जेव्हा ते सापडले नाही ते नगर वेशी बाहेर गेले आणि नदी काठी स्त्रीयांचा एक समुह त्यांस प्रार्थना करतांना आढळला. तेथे लुदीया नावाची कोणी एक जांभळी वस्त्र विकणारी स्त्री होती. देवाने पूढे जाऊन तारणाच्या संदेशाकरीता (वचन १६) तिचे अंतःकरण तयार केले होते. प्रेषित १६ : १४ सांगते की, लुदिया त्यांचे भाषण ऐकत होती आणि तिचे अंतःकरण प्रभूने प्रफुल्लीत केले. त्या सामन्यात लुदीयाची जिवनदिशा बदलली ; जसे पौलाचे दमीष्क वाटेवर. देवाने तिचे जिवन फिलिप्पैमध्ये मंडळी उभारण्यास उपयोगी आणले आणि संपूर्ण युरोपभर सुवार्ते करीता दार उघडले. लुदीया समान काय तुम्ही देखील सत्याकरीता उपाशी आहात?

## घोषवाक्य

फिलिपैकरांस पत्र पौलाच्या १३ पत्रांपैकी एक आहे, परंतु कदाचीत त्या सर्वांपैकी हे वैयक्तीक व आनंददायक पत्र आहे. चार लघु अध्यायांमध्ये तो “संपन्नतेच्या जिवनाचे” खरे रहस्य प्रगट करतो. योहान १० : १० मध्ये येशु म्हणतो, “मी तर त्यांना जिवन प्राप्त व्हावे व ती विपूलपणे व्हावे म्हणून आलो आहे.” फिलिपैकरांस हे पुस्तक सहसा आनंदाचे पुस्तक म्हटल्या गेले आहे. आनंद हा शब्द १६ वेळेस वापरला गेला आहे. हा आनंद परीस्थीतीवर आधारीत नसुन परिस्थितीवर मिळवलेला विजयास प्रतिसाद आहे. काय हे रहस्य आम्ही आपल्या जिवनात वाढविणे आवडणार नाही.

# फिलिप्पैकरांस : पुर्ण आणि सार्थ जिवनाचे रहस्य

## प्रकरण एक : अध्याय १

**विषय वाक्य :** पौल त्रासाला मोठया हेतू प्राप्तीत बदलतो

### दिवस १

**वाचा १ : १ - ६**

१. फिलिप्पै येथील जनांबद्दल पौलाची कोणती वागणूक तुम्ही सांगणार (वचन १- ५)?

२. वचन ६ मध्ये आम्हा करिता कोणती प्रतिज्ञा आहे ?

### दिवस २

**वाचा १ : ७ - ११**

१. वचन ९ - ११ मध्ये पौलाने केलेल्या प्रार्थनेची यादी बनवा.

अ.

ब.

क.

ड.

२. अशा गोष्टिंविषयी तुम्ही स्वतः करीता किंवा इतरांकरीता केली आहे काय ?

३. देव कोणविषयी तुम्हास प्रार्थना करण्यास सांगत आहे?

### दिवस ३

**वाचा वचन ९ ते ११**

१. प्रितिज्ञान व सर्वप्रकारच्या विवेकाची उत्तरोत्तर अतिशय वाढ मिळविण्यास तुम्ही काय करणार?

२. निर्मळ व निर्दोष जिवन मिळविण्यास तुम्ही काय करणार

## दिवस ४

**वाचा वचन १२ - १८**

१. पौलाच्या बंदीवासाचे सुपरिणाम कोणते आले (१२-१८)?

२. कोणत्या परिस्थितीत आज तुम्ही स्वत:ला बंदिवासात समजता?

३. तुमच्या बंदिवासातुन किंवा कठीण परिस्थितीतून तुमच्या करीता किंवा इतरांकरीता कोणते सुपरिणाम येतात?

## दिवस ५

**वाचा वचन १८ - ३०**

१. जगण्याकरीता पौलाची कारणे कोणती होती?

२. मरण्याकरीता पौलाची कोणती कारणे होती?

३. पौलाच्या सुटके करीता वाट पाहण्यातील प्रगट ३-४ वैशिष्टये सांगा?

४. आज तुमच्या जिवनात ही समान वागणुक कोणते अंतर आणते ?

## दिवस ६

**प्रकरण : १ "त्रासातील आनंद"**

**पाठ** : अध्याय १

**मुख्य वचन :** फिलिप्पै १ : २१, "कारण मला तर जगने हे ख्रिस्त आणि मरणे लाभ आहे."

**विषय वाक्य :** पौल त्रासांना मोठया हेतू प्राप्ती करीता बदलतो.

**जिवन तत्व :** जिवनातील सामान्य त्रासामध्ये आनंद करणे शिकुया.

**सारांश :** पौल हया आनंदी पत्राची सुरुवात फिलिप्पैकरांना सुवार्ता प्रसार करण्यातील त्यांचा भागीदारी बद्दल आभार प्रगट करण्यांतून करतो. नंतर तो आपल्या प्रिय मित्रांकरीता प्रार्थना करतो (वचन ९ - ११), अशी प्रार्थना जी आम्ही ज्यांना जानतो त्यांच्या करीता करु शकतो. पौल बंदीवासातून लिहीत होता, रोम मध्ये बेडयांत होता, तरीही आपल्या परीस्थितीच्या कायदयांकडे आनंदाने लक्ष पूरवितो. सुवार्तेस अडखळन बनण्याऐवजी येशु ख्रिस्ताचे शुभवर्तमान

सर्वत्र पसरत गेले सर्वांना ठाऊक होते की, तो आपल्या विश्वासामुळे बंदीवासात होता आणि त्यामुळे सहविश्वासणाऱ्यांना धाडस प्राप्त झाले आणि येशुच्या गोष्टीं विषयी काही इतर जिज्ञासू झाले. त्यांस साथ म्हणुन दोन वर्षांतील नजर कैदेत. तो वेगवेगळया वर्गातील लोकांच्या संपर्कात आला. पौलाने पाहीले की, त्याच्या त्रासामागे देवाचा एक मोठा हेतु होता. विश्वासी म्हणुन ख्रिस्तामध्ये भरवसा ठेवण्यास आम्हास चांगली संधी प्राप्त आहे. हयामध्ये त्याच्या करीता त्रास सहनकरणे जुडले आहे. (१ पेत्र २ : २१) स्वर्गाचे नागरीक म्हणुन एक आत्म्यात एकत्र आणि एका उद्देशास मिळविण्याकरीता आम्हाला एकमेकांना आधार व उत्साह देण्याची गरज आहे.

## जिवनातील सामान्य त्रासामध्ये आनंद करणे शिकुया

# फिलिप्पैकरांस : पूर्ण व सार्थ जिवनाचे रहस्य

## प्रकरण १ : अध्याय २

**विषयवाक्य :** खरा सेवक म्हणून येशू आमचा आदर्श आहे.

**दिवस १**

**अध्याय १ ची पुन्हा उजळणी करा.**

१. बेडया आणि बंदी होने हया बद्दल पौलाची वागणूक तुम्हास कशी उत्साहीत करते ?

२. पौलाच्या बंदीवासातील कोणता भाग त्याच्या करीता अधिक कठीन असल्याचा तुम्हास वाटतो?

३. तुम्हा करीता कठीन कोणता असु शकतो किंवा आहे?

**दिवस २**

**वाचा अध्याय २**

१. पौलाचा आनंद काय पुर्ण करील ?

२. वचन ३ आणि ४ मधुन चार वागणूकी शोधा ज्या लोकांमधील एकतेमध्ये अडखळन उत्पन्न करतात.

३. आपली वागणुक बदलण्यास पौल काय सांगतो ?

४. पुढील वचनांननुसार, ख्रिस्ताने निवडलेली वागणूकीची यादी बनवा.

अ. मत्तय ११:२९

ब. मत्तय १२ : १८-२०

क. मत्तय ८:२०

ड. योहान ५ :१९, ३०

ई. योहान ३ : १७, ८ : ११

फ. मत्तय ९:३६, मार्क ६:३४

## दिवस ३

**वाचा २: ५- ११**

१. हया भागात ख्रिस्ताचे वर्णन करण्याकरीता होईल तितके क्रिया विशेषणाची यादी बनवा.

२. प्रत्येकांना आराधनेची कोणती मूद्रा शेवटी येशू समोर उभी करते ?

## दिवस ४

**वाचा २ : १२-१८**

१. वचन १५ आणि १६ मधुन ते कोण कोणते मार्ग आहेत जे आपले तारण जगण्या विषयी सांगतात ?

२. अंधारातील या जगात विश्वासी कसे चमकू शकतात ?

## दिवस ५

**वाचा २ : १९-३०**

१. आदर्श बाळगण्या करीता पौल तीन लोकांची नावे सांगतो. ती कोण आहेत आणि ती ३ चांगली उदाहरणे का आहेत ?

२. काय कोणी आहे जे तुम्हा करीता आदर्श ठरले ?

३. त्याने ज्यांना तूमच्या जिवनात आणिले अशांकरीता प्रभूला धन्यवाद दया.

## दिवस ६

**प्रकरण २ : "सेवेतील आनंद"**

**पाठ** : अध्याय २

**मुख्यवचन:** फिलीप्पै २:५, "अशी जी चित्त वृती ख्रिस्त येशूच्या ठाई होती ती तूमच्या ठायी ही असो."

**विषय वाक्य :** येशू आमचे खऱ्या सेवकाचे उदाहरण होय.

**जिवनतत्व :** आमच्या नम्रतेच्या क्रिया अंधार विश्वातील उजेड आहे.

**सारांश :** फिलीप्पै मंडळीतील प्रिती आणि एकते विषयी कमतरता पौलास काळजी उत्पन्न करते. वादात मंडळी आपली साक्ष गमविते. वचन २ मध्ये तो मंडळीला एक जिव होऊन एकचित्त होण्यास सांगतो. नम्रता आणि प्रिती संबंधाकरिता आदर्शासाठी पौल आम्हास ख्रिस्ताकडे केंद्रित करतो. त्याने हयास आपला हक्क असा समजला नाही परंतु स्वतःला रिक्त केले आणि देवाच्या हाती सर्व काही स्वाधीन केले. वचन १२ मध्ये पौल म्हणतो, "भीत व कापत आपले तारण साधून घ्या." देवासह आपले संबंध वाढण्याकरिता आम्हासह कर्तव्यनिष्ठ राहावे लागेल. वचन १३ नुसार देव आम्हास आपली शक्ती व सामर्थ्य त्याचा मार्ग निवडण्याकरिता पूरवेल आणि ते करण्याकरिता मदत करेल. येशूची अशी वागणूक प्राप्त केल्यास हरवलेल्या विश्वात आम्ही चमकणाऱ्या ताऱ्यांसमान असणार.

**आमच्या नम्रतेच्या क्रिया अंधार विश्वातील उजेड आहे.**

# फिलीप्पैकरास : पूर्ण व सार्थ जिवणाचे रहस्य

## प्रकरण १ : अध्याय ३

**विषय वाक्य :** जिवनात ख्रिस्ताला जाणन्याच्या तूलनेत सर्व काही निरुपयोगी आहे.

## दिवस १

**वाचा ३:१-४**

१. पौल आम्हास आपल्या जिवनातील परिस्थीतीमूळे आनंदि होण्याची आठवण करून देत नाही, परंतू एका व्यक्ति मूळे. तो व्यक्ति कोण ?

२. आपल्या परिवर्तनापूर्वी पौल कशावर भरवसा ठेवायचा (४)?

## दिवस २

**वाचा ३ : ५-११**

१. ख्रिस्ताकडे परिवर्तन होण्याच्या पूर्वी पौल कोणत्या गोष्टिंवर अभिमान बाळगायचा त्यांची यादी बनवा ?

२. ख्रिस्ताला जाणून घ्येण्याकरीता जगातील लाभाची तूलना पौल कशी करतो.(८) ?

३. जिवनातील सर्वोच्च प्राप्ती पौल कशाला समजतो ?

## दिवस ३

**वाचा इफी. ३ :१४-१५, फिलीप्पै ३:७-११**

१. स्वतः करीता किंवा इतरांकरिता हया गोष्टिंविषयी ( इफि.३:१४-१९) प्रार्थना करावयास वेळ काढा.

२. ख्रिस्ताला जाणून घेण्यासोबत कोणत्या तिन गोष्टी घनिष्टतेने जूळल्या आहेत.

## दिवस ४

**वाचा ३:१२-१६**

१. अशा वाक्य रचना लिहा ज्या दर्शवितात की पौलाच्या जिवनातील शेवटच्या क्षणीही तो भूतकाळातील प्राप्तींवर गर्वीष्ठ नव्हता किंवा आपले लक्ष्य साधण्याकरिता थांबला नव्हता ? (१२-१५)

२. तिन किंवा अधिक क्रिया शोधा ज्या पौलाने निवडल्या (१२-१५)

३. पौलाचा निशाना कोणता होता ?

## दिवस ५

**वाचा ३:१७-२१**

१. विशीष्ट लोकांकरिता पौल रडला त्याचे वैशिष्टये काय होते (वचन १८-१९)?

२. पौलाचे अनुकरण करण्या करीता पौल तुम्हाला कोणती तीन कारणे सांगतो ? (२०-२१)

## दिवस ६

**प्रकरण ३ : "ख्रिस्ताला जाणण्यातील आनंद"**

**पाठ** : अध्याय ३

**मुख्यवचन** : फिलीप्पै ३ : १० "तो व त्याच्या पुनरुत्थानाचे सामर्थ्य व त्याच्या सुरुवातीची सहभागीता हयांची त्याच्या मरणाला अणुरुप होवून मी ओळख करुन घ्यावी."

**विषय वाक्य** : जिवनात ख्रिस्ताला जाणून घेण्याच्या तुलनेत सर्व काही निरुपयोगी आहे.

**जिवन तत्व** : दररोजच्या जिवनात मी पणाला मारण्यात अग्रेसर असणे.

**सारांश :** आंतरिक फुटीतील धोक्याविषयी सावध केल्या नंतर पौल बाहय धोक्याविषयी ताकीद देतो. तो स्वतःच्या जिवनातून सुंतेतील विश्वास, कौटुंबीक पृष्ठभूमी, वैयक्तीक चारीत्र्य आणि ध्येय प्राप्तीचे जिवन हयांवरुन विरोधाभास उत्पन्न करतो. त्याचे उद्देश आता बदलले आहे कारण तो परावर्तित झालेला आहे. आता त्याचा उद्देश ख्रिस्ताला जाणने आणि ज्याकरीता त्याला

देवाने निर्माण केले त्यातील हेतु पुर्ण करणे होय. वचन १२ आणि १३ मध्ये तो स्पष्ट करतो की, हया करीता सर्व आयुष्यभर प्रयत्नशील असावे लागेल.

**जेव्हा तुम्ही आपला त्रास प्रभुला सोपविता आणि त्याच्या गौरवाकरीता त्याच्या सह त्यातुन जाणे निवडता, तेव्हा तुम्हास कळेल की तुमचा त्रास वाया जाण्याकरीता नव्हे.**

**वाढण्याकरीता संधी गमावू नका.**

# फिलीप्पैकरांस : पूर्ण व सार्थ जीवनातील रहस्य

## प्रकरण पहिले : अध्याय ४

**विषय वाक्य :** आभारी प्रार्थना आमचे अंतःकरण बदलते.

### दिवस १

**वाचा ४:१-३**

१. वचन १ मध्ये कोणती आज्ञा आहे ?

२. जिवनाच्या पूस्तकात कोणती नावे लिहिली जातिल ?

### दिवस २

**वाचा ४:४-७**

१. आनंद साजरा करण्यातील आज्ञेत अधिक कोणती आज्ञा जुळते ?

२. चिंता करीत बसण्यापेक्षा आपन काय करु शकतो ?

३. चिंतेला स्विकार करणे व हाताळणे हयांतील परिणाम कोणता ?

### दिवस ३

**वाचा ४:८-९**

१. आम्ही कशा विषयी विचार करावा ?

२. वचन ९ मध्ये क्रियाशिल वचन कोणते ? ( याकोब १:२२-२५ हे देखील बघा.)

### दिवस ४

**वाचा ४:१०-१३**

१. कोणत्या प्रकारच्या परिस्थितींना पौलाने अनुभवले आणि तो काय शिकला ?

२. पौलाचे समाधानी असण्यातील गुपीत कोणते (वचन १३) ? हे तुम्हास अत्साहित करते की निराश करते ?

## दिवस ५

**वाचा ४:१४-२३**

१. फिलिप्पैकर जसे वाटतात पौलाची त्यांच्याविषयी इच्छा कोणती ?

२. फिलिप्पैकरांच्या देणग्या सुगंधा समान का होत्या ?

३. इतरांना देण्यांत कोणती प्रतिज्ञा आम्हाकरीता जुळली आहे ?

४. हया अभ्यासांतर्गत कोणती सवय तुम्ही आपल्या जीवनात लाविली आहे काय ?

## दिवस ६

**प्रकरण ४ : "आभारासह प्रार्थनेतील आनंद"**

**पाठ** : अध्याय ४

**मुख्यवचन :** फिलिप्पै : ४:१३, "मला जो सामर्थ्य देतो त्याच्याकडून मी सर्व काही करावयास शक्तीमान आहे"

**विषयवाक्य :** आभारी प्रार्थना आमचे अंतःकरण बदलने.

**जिवनतत्व :** स्तुती आणि देण्यातील सवय तृप्त होण्यातील गुपीत आहे.

**सारांश :** आपल्या शेवटच्या अध्यायात पौल आम्हास चिंतेत असता, इष्ट हेतु साध्य करण्याचा मार्ग सांगतो ! त्यामधिल घटकामध्ये प्रार्थना, धन्यवाद आणि समर्पण होय. आपल्या गरजांकरीता आम्ही प्रभूजवळ धन्यवादासह प्रार्थना करुन त्याच्या जवळ सोपवून दयावे. देवाची शांती जी आमच्या समजण्यापलीकडे आहे आपले अंतःकरण व विचार येशूच्या ठायी राखील. पौल पुढे आपल्या जीवनातील धडे शिकवितो सर्वांत पहिले म्हणजे समाधानी असण्याचे. त्याच्या विस वर्षाच्या सेवेत त्याने मोठा त्रास सहन केला व त्याशिवाय तो राहीला नाही. तरीही तो जेथे कोठे आणि ज्या काहींत तो होता त्यात तृप्त असणे शिकला. वचन १३ मध्ये तो आपले गुपीत आमच्यासोबत वाटतो. "मला जो सामर्थ्य देतो त्याच्याकडून मी सर्व काही करावयास शक्तीमान आहे." अशा प्रकारच्या निश्चयीकरणास सवयीची गरज असते जशी आपण स्वतःवर अवलंबून

राहण्यापेक्षा ख्रिस्तावर असतो. ज्या मार्गाने तो ख्रिस्ताच्या मागे जसा चालला, पौल फिलिप्पैकरांना आपले आदर्श राखण्यास सांगतो. त्याने आपली धाव पूर्ण केली, त्याने आपले युद्ध संपविले आहे आणि विश्वास राखला आहे. तोच देव आज आम्हा मध्ये देखील वस्तीस आहे. काय पौलासह तुम्ही हया गोष्टीवर सहमत होणार की तुमच्या जवळ ख्रिस्तामुळे तुमच्या जीवनांत, आदर्शात, तुमच्या आत्मविश्वासात आनंद आहे आणि तो तुमचे बळ आहे.

## स्तुती आणि देण्यातील सवय हे तृप्ततेचो गुपीत आहे.